आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

३१ मे २०२४ - शुक्रवार

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून ५७ लोकसभा मतदारसंघामध्ये उद्या, शनिवारी मतदान होणार आहे. मतदानाच्या दृष्टीनं प्रशासन सज्ज होत आहे. सर्व मतदारसंघांमधे मतदान यंत्र आणि मतदान साहित्य घेऊन नियुक्त कर्मचारी मतदानकेंद्राकडे रवाना झाले आहेत. उष्णतेच्या लाटेची स्थिती लक्षात घेऊन मतदान केंद्रांवर पिण्याचं पाणी, सावली, स्वच्छतागृहं, चाकाच्या खुर्च्या, इत्यादी सुविधा उपलब्ध करुन द्याव्या असं निवडणूक आयोगानं सर्व राज्य निवडणूक कार्यालयांना सांगितलं आहे. ठिकठिकाणी पोलीस आणि इतर सुरक्षा दलांचा बंदोबस्त आहे. या टप्प्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांच्यासह एकूण ९०४ उमेदवारांचं भवितव्य उद्या मतदान यंत्रात बंद होईल.

**<><><><><>**

मतदानाच्या टक्केवारीत वाढ झाल्याची चर्चा निराधार असल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आकाशवाणीला सांगितलं की, मतदानाची टक्केवारी कोणीही वाढवू शकत नाही, तसंच किती मतदान झालं यांची नोंद असलेल्या फॉर्म १७ C ची प्रत उमेदवार आणि प्रतिनिधींना देण्यात आलेली आहे. मतदारांच्या मतदानाची माहिती आणि ईव्हीएमची सर्व माहिती निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर अद्ययावत केल्याचंही राजीव कुमार यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रात लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीची सर्व टप्प्यातली मतदान प्रक्रिया पूर्ण झाली असली; तरी आदर्श आचारसंहिता अद्याप लागू आहे; त्यात

कोणत्याही प्रकारची शिथिलता देण्यात आलेली नाही, असं मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवलं आहे. निवडणूकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर नवीन लोकसभा स्थापित झाल्याची अधिसूचना आयोगाकडून प्रसिद्ध होईपर्यंत आचारसंहिता कायम राहणार असल्याचं या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या काळात प्राप्तीकर विभागाानं एक हजार १०० कोटी रुपयांची रक्कम आणि दागिने जप्त केले आहेत. २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीवेळी ३९० कोटी रुपये जप्त केले होते. त्या तुलनेत हे प्रमाण १८२ टक्क्यांनी जास्त असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

**<><><><>**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षाला आज पासून प्रारंभ झाला. अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त आज राज्यात विविध कार्यक्रम होत आहेत.

राज्यपाल रमेश बैस यांनी मुंबईत राजभवनातील अहिल्यादेवींच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी अहिल्याबाई होळकरांना समाज माध्यमांवर आदरांजली वाहिली आहे. मंत्रालयात सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर

विद्यापीठामध्ये यानिमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या. काल पारंपरिक गजीनृत्याचं, तसंच ‘मी अहिल्या बोलतेय’, या नाट्यप्रयोगाचं सादरीकरण झालं.

**<><><><>**

राज्यातल्या मोठे, मध्यम आणि लघु अशा एकूण दोन हजार ९९७ प्रकल्पात सध्या केवळ २२ पूर्णांक सहा शतांश टक्के इतका पाणीसाठा आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी राज्यातल्या एकूण पाणीसाठ्यात लक्षणीय घट झाली असून, अनेक भागात भीषण पाणीटंचाई जाणवत आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातल्या ४४ मोठ्या प्रकल्पात आठ पूर्णांक ९२ शतांश टक्के, ८१ मध्यम प्रकल्पात ११ पूर्णांक ४९शतांश टक्के, तर ७९५ लघु प्रकल्पात सहा पूर्णांक ७६ शतांश टक्के इतकाच पाणीसाठा असल्याची माहिती जलसंपदा विभागानं दिली आहे. मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या सातही तलावांमध्ये केवळ ८ टक्केच पाणीसाठा शिल्लक आहे. मुंबईत येत्या ५ तारखेपासून १० टक्के पाणी कपातीचा निर्णय महानगर पालिकेनं घेतला आहे.

**<><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं १९९१ नंतर पहिल्यांदाच ब्रिटनहून १०० टनापेक्षा जास्त सोनं आपल्या तिजोरीत आणलं आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर रिझर्व बँकेत सोनं जमा होण्याची ही पहिलीच वेळ आहे. भविष्यात अशाच प्रमाणात सोनं देशात आणलं जाणार असल्याची माहिती काल सूत्रांनी दिली. गेल्या काही काळापासून रिझर्व्ह बँकेनं सोनं खरेदी करायला सुरुवात केली होती. हे सोनं परदेशात जमा होत होतं. आता त्यापैकी काही सोनं भारतात आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

बँक ऑफ इंग्लंडमध्ये अनेक देशांच्या केंद्रीय बँकांचा सुवर्णसाठा मोठ्या काळापासून ठेवला जातो.

<><><><><>

मध्य रेल्वेच्या सीएसएमटी आणि ठाणे स्थानकात ६३ तासांच्या विशेष मेगाब्लॉकचा परिणाम रेल्वेसेवेवर झाला असून चाकारमान्यांना अडचणींना सामोरं जावं लागत आहे. मुंबईत गुरुवारी मध्यरात्रीपासून तीन दिवस ९५३ लोकल आणि ७२ मेल एक्स्प्रेस रद्द करण्यात आल्या आहेत. या ब्लॉकदरम्यान पर्यायी व्यवस्था म्हणून एसटी महामंडळाने आणखी ५० बसेस चालवण्याचा निर्णय घेतला आहे. सीएसएमटी ते ठाणे स्थानकादरम्यान धीम्या मार्गाचे काम युद्धपातळीवर सुरू असून, ते लवकरच पूर्ण होईल. प्रवाशांनी सहकार्य करण्याचे आवाहन मध्य रेल्वेने केलं आहे.

<><><><><>

हॉटेल मालक जया शेट्टी हत्या प्रकरणात कुख्यात गुंड छोटा राजनला मुंबईच्या मोक्का न्यायालयानं काल १६ लाख रुपयांच्या दंडासह जन्मठेप सुनावली . राज्य सरकारनं छोटा राजन विरोधातली ७१ प्रकरणं साबीआय, अर्थात केंद्रीय अन्वेषण संस्थेला हस्तांतरीत केली आहेत. हे एक त्यातलंच प्रकरण. या आधी पत्रकार जे डे हत्या प्रकरणातही छोटा राजनला जन्मठेप सुनावण्यात आली होती.

//<><><><><>//